## श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

## अधिकमास २०१८ कालावधीतील सप्ताहाबाबत.

श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरात अधिकमास २०१८ कालावधीत सप्ताह करण्यास विहीत नमुन्यात दि.१५/०१/२०१८ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचा नमुना व अटी व शर्ती www.vitthalrukminimandir.org या संकेत स्थळावर व तुकाराम भवन, पंढरपूर येथे पाहण्यास उपलब्ध आहेत.

क्र.नित्योपचार विभाग/का.वि./११२४/२०१७ दि.०४/१२/२०१७

स्वा/—

कार्यकारी अधिकारी

(संपर्क क्र.: ०२१८६—२२४४६६)

**श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**
**अटी व शर्ती (जाहिरात दि.०५/१२/२०१७).**

माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....

१. सदरबाबतची माहिती, अटी व शर्ती आणि अर्जाचा नमुना कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे व www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळेल.

२. अधिकमास दि.१६/०५/२०१८ ते १३/०६/२०१८ या कालावधीत संपन्न होत आहे. सदर यात्रा कालावधीत श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरात श्री. विठ्ठल सभामंडप, श्री. रूक्मिणी सभामंडप, बाजीराव पडसाळी व संत तुकाराम भवन येथे सप्ताह करण्यासाठी परवानगी मागणीकामी येणाऱ्या अर्जांची लक्षणीय संख्या लक्षात घेता, मंदिर समितीच्या दि. २२/११/२०१७ रोजीच्या सभेतील ठराव क्र. १० अन्वये वर्तमानपत्रात जाहिरात देवून, इच्छुक महाराज मंडळींकडून अर्ज मागवून आवश्यकतेनुसार सोडत पध्दतीने सप्ताह करण्यास परवानगी देण्याचे ठरले आहे.

३. सदर कामी प्राप्त अर्जांमध्ये एकाच कालावधीसाठी व एकाच ठिकाणी अनेक अर्जदारांनी परवानगी मागितल्यास दि.१९/०१/२०१८ रोजी सोडत पध्दतीने (चिट्टीद्वारे) सप्ताह करण्यासाठी परवानगी देण्यात येईल.

४. अर्ज इकडील नमुन्यात स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर अर्जदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि अर्ज ''अधिकमास २०१८ मध्ये सप्ताह करण्याबाबत'' असा सविस्तर तपशिल नमुद करावा. अर्ज दि.१५/०१/२०१८ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील. तसेच उशिरा आलेले अर्ज व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. परंतू सदरबाबत यापूर्वी केलेल्या अर्जदारांनी पून्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

५. पोलीस विभागाच्या निर्देशानुसार सदर अधिकमास कालावधीत दशमी, एकादशी व द्वादशी दिवशी मंदिरात सप्ताह करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

६. सदर ठिकाणी सप्ताह करण्यास कोणत्याही व्यक्तीस परंपरेनुसार कोणत्याही स्वरूपाचा हक्क सांगता येणार नाही.

७. अर्जासोबत अर्जदाराचा ओळखपत्र म्हणून आधारकार्ड/मतदान कार्ड यांची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

८. तसेच अर्जामध्ये सप्ताह करण्यासाठी मंदिर समितीकडील श्री. विठ्ठल सभामंडप / श्री. रूक्मिणी सभामंडप / बाजीराव पडसाळी / तुकाराम भवन यापैकी एकच ठिकाण नमुद करणे आवश्यक आहे.

९. सदर सप्ताह करण्यासाठी देण्यात येणारी परवानगी 'अधिकमास २०१८' साठी सिमित राहील. सदर कालावधीत सप्ताह करणारे अर्जदार याबाबत भविष्यात परंपरेनुसार हक्क सांगू शकणार नाहीत.

१०. सदर कालावधीत भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, सप्ताहामधील वाचकांची संख्या जास्तीतजास्त १०० ते १२० असावी.

११. सप्ताह करण्यासाठी लागणारे साहित्य अर्जदाराने स्वत:चे आणावयाचे आहे. मंदिर समितीकडून फक्त विद्युत व्यवस्था पुरविण्यात येईल.

१२. सदर सप्ताह करण्यासाठी परवानगी दिल्यानंतर सप्ताहाच्या ठिकाणी स्टेजचा आकार, स्पीकरच्या आवाजाची मर्यादा, डिजीटल बोर्ड याबाबत मंदिर समितीकडून ठरवून दिलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

१३. सदर सप्ताहाच्या ठिकाणी व्हीडीओ शुटींग व फोटो काढण्यास पोलीस विभागाच्या निर्देशानुसार मनाई करण्यात आली आहे.

१४. सदर सप्ताहाला येणाऱ्या वाचकांना श्रीच्या दर्शनाची विशेष व्यवस्था मंदिर समितीकडून करण्यात येणार नाही किंवा ते हक्क सांगू शकणार नाहीत.

१५. सदर सप्ताहाच्या ठिकाणी मंदिर समितीने ठरवून दिलेल्या प्रवेशदारातूनच प्रवेश दिला जाईल.

१६. सदरच्या कालावधीत मंदिर समितीकडून सप्ताह करण्यास खालीलप्रमाणे देणगी मुल्य आकारण्यात येईल. ते आगाऊ स्वरूपात तात्काळ भरणा करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाण | देणगी मुल्य रू. | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | श्री. विठ्ठल सभामंडप. | ३०००/- | |
| २ | श्री. रूक्मिणी सभामंडप. | ३०००/- | |
| ३ | बाजीराव पडसाळी. | ३०००/- | |
| ४ | संत तुकाराम भवन. | ३०००/- | |

१७. सदरबाबत अर्जदारास फक्त एकच अर्ज सादर करता येईल. एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच सप्ताहाचे ठिकाण फक्त एकच निवडता येईल. एकदा अर्ज केल्यानंतर सप्ताहाचे ठिकाण / कालावधी बदलता येणार नाही.

१८. सदर अर्ज अधिकमास २०१८ मध्ये सप्ताह करण्यासाठी परवानगी देण्याबाबत मागविण्यात येत आहे. सदर अर्जाद्वारे अर्जदार सप्ताह करण्यास हक्क सांगू शकणार नाही.

१९. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते अर्जदारावर बंधनकारक राहील.

२०. प्रशासकीय व अन्य कारणास्तव सदरची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थिगीत अथवा रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

२१. सदर कामासंबंधी काही वाद उद्भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

२२. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस अर्जदारास जबाबदार धरणेत येईल व दिलेली परवानगी कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

**अर्ज**

प्रति,

मा. कार्यकारी अधिकारी,
श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

विषय :– अधिकमास २०१८ मध्ये सप्ताह करण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती.

पूर्ण नाव :– श्री.––––––––––––––––––––––––––––––

पूर्ण पत्ता :– ––––––––––––––––––––––––––––––
––––––––––––––––––––––––––––––

मोबाईल क्रं.:– ––––––––––––––––––––––––––––––

महोदय,

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने अधिकमास २०१८ मध्ये सप्ताह करण्याबाबतच्या दि.०५/१२/२०१७ रोजीचे दै. पुण्यनगरी / पुढारी या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहीरातीप्रमाणे मला अधिकमास २०१८ मध्ये खालीलप्रमाणे सप्ताह करण्यास परवानगी मिळणेस विनंती आहे.

| अ. क्र. | सप्ताहाचे ठिकाण | कालावधी | | वेळ | |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | | | | | |

याबाबत मंदिर समितीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहे. त्यानुसार मला वरीलप्रमाणे सप्ताह करण्यास परवानगी मिळणेस विनंती आहे.

दिनांक /१२/२०१७ नाव व स्वाक्षरी

सोबत :– ओळखपत्राची झेरॉक्स प्रत. (उदा. मतदान कार्ड व आधारकार्ड)